कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५इतिवृतांत*

# नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)

# सभा क्र. १४

- वार :- मंगळवार
- दिनांक :- १०.०६.२०२५
- वेळ :- सकाळी ११.०० वाजता
- स्थळ :- कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

# विषयावरील ठराव

# (इतिवृतांत)


कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

सदर बझार, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, सातारा

फोन नं. ०२१६२-२३०६३६, २३३००५

ईमेल - office@kbpcoes.edu.in

वेबसाईट - www.kbpcoes.edu.in

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १४/२०२५/** **दि. - १०.०६.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १४**

**दिनांक - १०.०६.२०२५**

**वेळ - सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १४ वी सभा **मंगळवार दि. १०.०६.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली ऑनलाईन सभा आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

**विषय – पत्रिका**

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | |
| विषय क्र. २ | महाविद्यालयातील Center of Excellence स्थापन करणेसाठी SimuSoft Technologies, Pune यांच्याकडून प्राप्त झालेल्या बिलाबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ३ | AICTE Sponsored International conference साठी Video Conference करिता लागणाऱ्या साहित्य (Equipment) खरेदी करण्याची परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ४ | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

प्रत - सर्व सन्मानीय सदस्य - नियामक मंडळ

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ इतिवृतांत

**जा. क्र. ग.ब.स./सभा १४/२०२५/** **दि. - १०.०६.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १४**

**दिनांक - १०.०६.२०२५**

**वेळ - सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १४ वी सभा **मंगळवार दि. १०.०६.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी ऑनलाईन संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. चंद्रकांत दळवी साहेब IAS (Retd.)<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. विकास देशमुख साहेब IAS (Retd.)<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ५. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ६. | मा. उदय जाधव | सदस्य |
| ७. | डॉ. एस. एल. नलबलवार | सदस्य |
| ८. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य |
| ९. | डॉ. सौ. एस. व्ही. माने | सदस्य |
| १०. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ इतिवृतांत*

### विषयावरील ठराव

**विषय क्र. १. :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १३. दि. ०५.०४.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.**

**टाचण** :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १३, दि. ०५.०४.२०२५ रोजीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. तसेच मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १३, दि. ०५.०४.२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १२ दि. १८.०२.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | मागील सभेचा इतिवृत्तात वाचून सर्व सहमतिने कायम करणेत आला. |
| ठराव क्र.०२ | महाविद्यालयातील Center of Excellence in AI-IoT & Robotics Automation लॅबची स्थापना करण्यासाठी व येणाऱ्या खर्चाबाबत चर्चा करणे. | महाविद्यालयात Center of Excellence स्थापन करण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र.३ | महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे. | महाविद्यालयातील IQAC Office and TPO Interview Cabins विभागाचे नूतनीकरण करणेसाठी व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र.०४ | महाविद्यालयातील खरेदी समिती बाबत चर्चा करणे. | महाविद्यालयातील नवीन खरेदी समिती स्थापन करण्यास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र.०५ | महाविद्यालयास ISO Certification घेण्यासाठी लागणाऱ्या फी ला परवानगी घेणे. | ISO Certification घेण्यासाठी लागणाऱ्या फी ला परवानगी दिली. |
| ठराव क्र.०६ | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | -- |

**वरील नुसार मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १३ मधील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व सभेने चर्चा करून अवलोकन केले.**

**सूचक :- मा. विकास देशमुख साहेब**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. ०२ - महाविद्यालयातील Center of Excellence स्थापन करणेसाठी SimuSoft Technologies, Pune यांच्याकडून प्राप्त झालेल्या बिलाबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव - ०२** - महाविद्यालयात Center of Excellence in AI-IoT & Robotics Lab ची स्थापना करणेसाठी महाविद्यालय नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र . १३ दि.०५.०४.२०२५ रोजीच्या सभेत चर्चा करून ठराव क्र. ०२ नुसार महाविद्यालयात Center of Excellence in AI-IoT & Robotics Lab स्थापन करण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाविद्यालयात स्थापन होत असलेल्या AI-IoT & Robotics Automation Centre (Centre of Excellence) या सेंटरसाठी SimuSoft Tecchnologies Pvt. Ltd., Pune यांच्याकडून तांत्रिक उपकरणे आणि सेवा घेतल्या जात आहेत. सदर सेंटर मुळे महाविद्यालयात उद्योग ४.० (Industry 4.0) संदर्भातील शिक्षण, संशोधन, उद्योग सहकार्य, तसेच नजीकच्या डिप्लोमा, ITI व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यासाठी अत्याधुनिक प्रयोगात्मक सुविधा उपलब्ध होणार आहेत. सदर केंद्र AI, IoT, Robotics, 3D Printing, Simulation, HPC यासारख्या तंत्रज्ञानाचे शिक्षण देईल व महाराष्ट्रातील ग्रामीण भागासाठी परिवर्तन घडवणारा ठरेल.

वरील नुसार महाविद्यालयात Center of Excellence चे केंद्र स्थापन करणेसाठी दि. १६.०४.२०२५ रोजी महाविद्यालयाने Simusoft Technologices Pvt. Ltd. यांना एकूण रु. १,८६,५५,८००/- च्या खरेदी आदेशानुसार उपकरणाचा पुरवठा व सेवा देण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सध्या महाविद्यालयाने रक्कम रु. ५०,००,०००/- अदा केले असून SimuSoft Technologies, Pune यांनी यामध्ये रक्कम रु. १,२०,७२,१०८/- किमतीची उपकरणे यशस्वीरित्या महाविद्यालयातील Center of Excellence च्या केंद्रामध्ये बसवून दिली आहेत. उर्वरित रक्कम रु. ६५,८३,६९२/- किमतीची उपकरणे तयार असून लवकरच बसविण्यात येणार आहेत.

SimuSoft Technologies Pvt. Ltd. Pune यांच्या कडून दि. २३.०५.२०२५ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी दिलेल्या सेवा व उपकरणांच्या बदल्यात रु. ८८,७७,५०८/- इतकी रक्कम मागणी केली आहे. जेणेकरून उर्वरित उपकरणांचा पुरवठा करता येईल.

तरी महाविद्यालयातील Center of Excellence च्या स्थापनेकरिता Simusoft Technologies Pvt. Ltd. Pune यांना आगाऊ रक्कम देण्यस सभेचे मार्गदर्शन मिळावे.

**ठराव** - कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि रोबोटिक्स ऑटोमेशनच्या उत्कृष्टता केंद्र (Center of Excellence - CoE) महाविद्यालयात स्थापन करणेसाठी सभेने चर्चा करून सदर सेंटर स्थापन करण्यासाठी लागणारी Equitment व Infrastrucutre Development साठी अंदाजे एकूण रक्कम २,२०,००,००० /-(दोन कोटी वीस लाख) एवढ्या खर्चास परवानगी दिली.

**सूचक :- मा. प्रतापराव पवार साहेब**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र. ३ :- AICTE Sponsored International conference साठी Video Conference करिता लागणाऱ्या साहित्य (Equipment) खरेदी करण्याची परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** :- AICTE AQIS Scheme अंतर्गत महाविद्यालयातील डॉ. मोदी एस.जे. व डॉ. माने एस. व्ही. यांनी दिलेल्या प्रस्तावास मान्यता मिळून रु. ३,००,०००/- एवढा फंड मंजूर झाला असून सदर International Conference दि. १३.०६.२०२५ व दि. १४.०६.२०२५ रोजी महाविद्यालयात आयोजन करणेत आलेले आहे. या International Conference साठी २५० Research Paper Presentation नोंदणी झालेली आहे. त्यापैकी २०० पेपर्स हे Conference मध्ये Presentation करणेकरिता उक्त तारखेस ऑनलाईन व ऑफलाईन द्वारे उपस्थित राहणार आहेत.

सदर International Conference मध्ये सहभागी होण्याकरिता रजिस्ट्रेशन फी मधून रक्कम रु. २,७०,०००/- एवढी जमा झालेली आहे. तसेच AICTE AQIS **Scheme** अंतर्गत रक्कम रु. ३,००,०००/- मिळणार आहेत.

त्यानुसार सदर International Conference करिता काही Participants हे ऑनलाईन Video Conference द्वारे Research Paper Presentation करणार आहेत. याकरिता खालील प्रमाणे उपकरणे आवश्यक आहेत.

| अ.क्र . | उपकरणाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | Aver PTZ Camera specification: Model No. -cams20pro3 | 1,10,000/- |
| २. | Stage Teleprompter Specification : Gettech | 95,000/- |
| ३. | Wireless Rode Mice Specification: Rode (Model No: GO2). | 28,000/- |
| ४. | Tripod Stand | 8,500/- |
| ५. | HDMI Video grabber card | 10,000/- |
| ६. | Cables & connector | 10,000/- |
| **एकूण रक्कम** | | **2,61,500/-** |

**आर्थिक तरतूद** :- वरील तक्त्यानुसार तांत्रिक उपकरणे खरेदी करण्यासाठी महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ इतिवृतांत*

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयात आयोजित केलेल्या AICTE AQIS **Scheme** अंतर्गत International Conference करिता काही Participants हे ऑनलाईन Video Conference द्वारे Research Paper Presentation करणार असल्याने सदर उपकरणे आवश्यक असल्याने वरील तक्त्यातील उपकरणे खरेदी करण्यास परवानगी सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** :- महाविद्यालयात आयोजित केलेल्या AICTE AQIS Scheme अंतर्गत International Conference करिता Participants ला चांगल्या रित्या ऑनलाईन Video Conference द्वारे Research Paper Presentation करण्यासाठी सभेने चर्चा करून खालील तक्त्यातील तांत्रिक उपकरणे खरेदी करण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली.

**सूचक** :- **प्रा. डॉ. एस. एल. नलबलवार**
**अनुमोदक** :- **डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा